# विभागीय आयुक्त यांचे कार्यालय, अमरावती

कॅम्प, अमरावती
दुरध्वनी- ०७२१-२६६२०३४/०७२१-२६६२९४७, फॅक्स-०७२१-२६६२७८२

---

क्र.आकाअ/मशा.४/प्र.क्र.- १६२९/२०१९ दि. ११ जुलै, २०१९

**वाचा :** १) शासन महसूल व वन विभाग परिपत्रक क्र.एसआरव्ही-१०२०००/प्र.क्र.१२७/ ई-९,दिनांक ०९ ऑक्टोंबर, २०००.
२) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.एसआरव्ही-२०११/प्र.क्र.२८२/२०१२, दि.२१.१०.२०११.

## परिपत्रक

दि.०१.०१.२०१६ ते ३१.१२.२०१७ या कालावधीतील दि.०१.०१.२०१८ रोजीच्या स्थितीवरील कार्यरत असलेल्या अव्वल कारकून व मंडळ अधिकारी संवर्गातील कर्मचाऱ्यांची विभागीय संयुक्त तात्पुरीत सेवाज्येष्ठता सूची या कार्यालयाचे परिपत्रक दि.१६.०४.२०१९ अन्वये प्रसिध्द करण्यात आलेली आहे. सदर जेष्ठतासूचीवर प्राप्त आक्षेपांचे निराकरण करुन विभाग स्तरावरील अव्वल कारकून व मंडळ अधिकारी संवर्गाची दि.०१.०१.२०१८ रोजीचे स्थितीवरील संयुक्त सेवाज्येष्ठता सूची या सोबत संलग्न केलेल्या परिशिष्टानुसार प्रसिध्द करण्यात येत आहे.

संबंधीत जिल्हाधिकारी यांनी त्यांचे जिल्ह्यांतर्गत जिल्हाधिकारी कार्यालय, उपविभागीय अधिकारी कार्यालय, तसेच सर्व तहसील कार्यालयांमध्ये सदर विभागीय संयुक्त सेवा ज्येष्ठता सूची प्रसिध्द करुन सर्व संबंधीत अव्वल कारकून व मंडळ अधिकारी यांचे निदर्शनास आणून द्यावी आणि त्याबाबतचा प्रसिध्दी अहवाल या कार्यालयास ३ दिवसाच्या आत सादर करावा.

(पीयूष सिंह)
**विभागीय आयुक्त,**
**अमरावती**

**प्रतिलिपी : माहिती तथा उचित कार्यवाहीस्तव.**

१) जिल्हाधिकारी, अमरावती / अकोला / यवतमाळ / बुलडाणा /वाशिम.
२) अपर आयुक्त, विभागीय आयुक्त कार्यालय, अमरावती.
३) उप आयुक्त (सामान्य प्रशासन /पुनर्वसन/रो.ह.यो.) विभागीय आयुक्त कार्यालय, अमरावती.
४) विशेष कार्य अधिकारी डॉ. पंजाबराव देशमुख विदर्भ प्रशासकीय व विकास प्रशिक्षण प्रबोधिनी,अमरावती
५) सहायक आयुक्त (भूसूधार/मा.व.क) विभागीय आयुक्त कार्यालय, अमरावती.
६) नाझर, विभागीय आयुक्त कार्यालय, अमरावती यांनी सदर यादी प्रसिध्द करुन त्याबाबतचा अहवाल सादर करावा.
७) निवड नस्ती.

## परिशिष्ठ - अ

## दि.०१.०१.२०१६ ते ३१.१२.२०१७ या कालावधीतील दि.०१.०१.२०१८ रोजीच्या स्थितीवरील मंडळ अधिकारी संवर्गाची विभागीय पातळीवरील सेवाजेष्ठतासूचीवरील आक्षेपांचे विवरण.

| अ. क्र. | आक्षेप घेण्याऱ्या अधिकाऱ्यांचे नावे | आक्षेप | जिल्हाधिकारी यांचे अभिप्राय | अभिप्राय | आक्षेप मान्य/ अमान्य |
|---|---|---|---|---|---|
| १ | श्री.बी.डी.गायकवाड, मंडळ अधिकारी, तहसील कार्यालय, मानोरा, जि.वाशिम | दि.०१.०१.२०१८ रोजी प्रसिध्द करण्यात आलेली अव्वल कारकून व मंडळ अधिकारी यांची सेवा जेष्ठतासूची प्रसिध्द करण्यात आली असुन सदर यादी मध्ये माझे नाव २४७ वर नमुद असुन त्यामधील जात वैधता रकान्यामध्ये कोणतीही नोंद नाही. त्यामुळे जात वैधता रकान्यात भटक्या जमाती (ब), असल्याबाबतची नोंद घेण्यात यावी. | -- | श्री. बी.डी.गायकवाड यांनी सादर केलल्या आक्षेप अर्जाचे अवलोकन केले असता विभागीय स्तरावरील मंडळ अधिकारी संवर्गातील सेवा जेष्ठता यादी मध्ये त्यांचे नाव जे.क्र.२४७ वर नमुद केले असुन जात वैधता रकान्यामध्ये कुढलाच उल्लेख केलेला नाही. श्री. गायकवाड यांनी सादर केलेल्या दस्त ऐवजावरुन ते एन.टी. बी प्रवर्गातील असुन त्यांची जात वैधता झालेली आहे. जात वैधता रकान्यामध्ये तशी दुरस्ती करण्यात येत आहे.<br>सबब आक्षेप मान्य. | मान्य |
| २ | श्री. एस.वाय.चव्हाण, मंडळ अधिकारी, तहसील कार्यालय, चिखलदरा, जि.अमरावती | श्री.एम.बी.सोळंके, यांना तत्कालीन विभागीय आयुक्त, अमरावती यांचे आदेश दिनांक ०६.०४.२०१७ नुसार मंजूर मानिव दिनांकाच्या आदेशामुळे ते मंडळ अधिकारी यांच्या ज्येष्ठता यादीमध्ये क्र. २ वर आले होते. परंतु मा.विभागीय आयुक्त, अमरावती यांचे दि.११.०२.२०१९ चे आदेशान्वये मानिव दिनांकाबाबतचा आदेश रद्द करण्यात आलेला आहे. त्यामुळे श्री.सोळंके यांना मुळ जेष्ठता क्रमांकावर समाविष्ठ करण्यात यावे. | -- | तत्का. विभागीय आयुक्त, अमरावती यांनी दि.०६.०४.२०१७ रोजीचे आदेशान्वये श्री. एम.बी.सोळंके यांना मंजुर करण्यात आलेला मानिव दिनांकाचा आदेश मा.विभागीय आयुक्त, अमरावती यांचे दि.११.०२.२०१९ रोजीचे आदेशान्वये रद्द करण्यात आलेला आहे.<br>श्री. सोळंके यांनी दि.११.०२.२०१९ च्या आदेशाविरुध्द मा. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधीकरण मुंबई, खंडपीठ नागपूर येथे अपिल प्रकरण दाखल केले असुन प्रस्तुत प्रकरणी मा. न्यायाधिकरणाने स्थगनादेश दिलेला आहे.<br>सबब आक्षेप अमान्य. | अमान्य |